INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राष्ट्रवाद
# (Dr. Babasaheb Ambedkar and Indian Nationalism)

**नितीन त्रिंबकराव क्षीरसागर**
संशोधक विद्यार्थी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद (महाराष्ट्र)
E-mail: nitu302@gmail.com

**डॉ. के. जी. सुर्यवंशी**
इतिहास विभागप्रमुख,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,
जालना (महाराष्ट्र)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/08.2022-33575541/IRJHIS2105032

**प्रस्तावना :**

आज देशात राष्ट्रवादावर जोरदार चर्चा सुरू झालेली असून आपण सर्वजण त्याचे भागीदार झालो आहोत. डॉ. बाबासाहेबांच्या राष्ट्र उभारणीच्या स्वप्नांचा अजून गांभीर्याने विचार झाला नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे, अन्यथा राष्ट्र आणि राष्ट्रवादाशी संबंधित अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांना तोंड देण्यासाठी आपण अधिक सक्षम झालो असतो.

डॉ. बाबासाहेबांच्या कार्याची आणि योगदानाची यादी खूप मोठी आहे. पण, त्यांच्या संपूर्ण कार्याचा विचार केला तर डॉ. बाबासाहेबांचे एकंदर चित्र राष्ट्रनिर्मात्याचे आहे. त्यांचे भारतीय राष्ट्रवादासंबधीचे विचार व भूमिका फार विस्तृत आहे.

**उदिष्टे :**

1. डॉ. बाबासाहेबांचे राष्ट्रवादाविषयीचे विचार समजून घेणे.
2. डॉ. बाबासाहेबांची भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील राष्ट्रवादाची भूमिका समजून घेणे.
3. सध्याच्या स्थितीतील भारतातील राष्ट्रवाद समजून घेणे.

**संशोधन पद्धती :**

या शोध निबंध लेखनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून त्यासाठी दुय्यम साधनाचा आधार घेण्यात आला आहे.

इ. स. 1947 पूर्वी, स्वातंत्र्य हा देशाचा मुख्य आवाज होता आणि त्यावेळी इतरही अनेक भिन्न आवाज होते. परंतु सर्वात प्रभावशाली आवाज काँग्रेसचा होता ज्यांना ब्रिटिश वसाहतवाद्यांपासून देश मुक्त करायचा होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचाही एक आवाज होता, जो त्यावेळेस कमकुवत होता आणि भारताच्या पुनर्निर्माणाविषयी बोलत होता. भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांना बळकट करूनच देशाचे पुनरुज्जीवन होऊ शकते, असा त्यांचा विश्वास होता.

डॉ. बाबासाहेब याच काळात एक मजबूत आवाज म्हणून उदयास आले. त्यांनी सामाजिक विषमता आणि अस्पृश्यतेपासून मुक्ततेबद्दल आवाज उठविला. याला राष्ट्रवादाचे एक सबाल्टर्न स्वरूप म्हटले जाऊ शकते ज्यामध्ये खालून आवाज उठतो आणि जो समाजातील दुर्बल, वंचित आणि शोषित वर्गाबद्दल बोलतो. जो वसाहतीक भारताच्या सामाजिक जीवनाचा भाग नव्हता अशा 6 कोटी जनतेचे प्रतिनिधी डॉ. बाबासाहेब बनले होते. समाजातील या वर्गाच्या मुक्तीशिवाय भारताची स्वातंत्र्य चळवळ पूर्ण होणार नव्हती. 20 व्या शतकातील भारताची स्वातंत्र्य चळवळ केवळ ब्रिटिशांकडून राजकीय सत्ता मिळवण्यासाठी नव्हती तर भारताला सनातनी परंपरा आणि संस्थांपासून मुक्त करून एक आधुनिक राष्ट्र बनवण्यासाठी होती. डॉ. बाबासाहेब राष्ट्रवादाच्या विरोधात नव्हते तर काँग्रेसच्या राष्ट्रवादाच्या विरोधात होते जे भारताला इंग्रजांपासून मुक्त करण्याची भाषा करत होते. परंतु ब्राह्मणी शोषणावर मात्र मौन बाळगत होते. डॉ.बाबासाहेबांच्या दबावामुळेच काँग्रेसने वंचित वर्गाच्या समस्यांची राजकीय पातळीवर दखल घेतली, त्यामुळे अधिकाधिक लोक स्वातंत्र्य चळवळीत सामील होऊ लागले.अगदी सुरुवातीपासूनच आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या प्रवृत्तीवर उच्च वर्गाचा प्रभाव होता ज्यामध्ये त्याच वर्गातील लोकांच्या हिताची चर्चा होत होती . त्यामुळे जेव्हा हे 'राष्ट्रवादी' नेते राष्ट्रहिताबद्दल बोलत तेव्हा ते फक्त त्यांच्या वर्गहिताबद्दल बोलत असत डॉ. बाबासाहेबांच्या उदयाने काँग्रेसची दलितांबद्दलची समज आणि काळजी उघड झाली. काँग्रेसचे नेतृत्व करताना त्यावेळसचे कॉंग्रेस नेते भारतीय समाजात प्रचलित असलेल्या विरोधाभासांवर बोलण्यास कचरत होते. या संकोच आणि निष्क्रियतेमुळे डॉ. बाबासाहेबांनी काँग्रेसच्या त्या दाव्याला विरोध केला ज्यामध्ये कॉंग्रेस म्हणायची की ती संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करते.

काँग्रेसने समाजातील वंचित घटकांच्या समस्या नीट समजून घेतल्या नसल्यामुळे आणि त्यांना नेतृत्वात वाटा न दिल्यामुळे, डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली एक सबल्टर्न राष्ट्रवाद निर्माण झाला. त्यांनी खालच्या स्तरातील लोकांना सोबत घेऊन जातीचा प्रश्न लोकशाही आणि राष्ट्रवादाशी जोडून राजकीय उंचीवर नेला. राष्ट्रवादाची कल्पना हे सामाजिक समावेशाचे एक उत्तम माध्यम आहे, जे जात, वर्णभेद यांच्या वरती समानतेची चर्चा करते. प्रत्येक व्यक्तीला अशा प्रणालीची आवश्यकता असते ज्यामध्ये तो विचार करू शकेल, त्याच्या जीवन-मूल्यांसह मोकळेपणाने पुढे जाऊ शकेल

व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली आणि सर्व समाजाला देशाच्या निर्णय प्रक्रियेत सामावून घेणारी आधुनिक लोकशाही हे राष्ट्रवादाचे अधिष्ठान आहे अशी डॉ. बाबासाहेबांची भूमिका होती त्यामुळे भारतीय राज्यघटनेत जात, धर्म, रंग, वर्ण, भाषा, संपत्ती इत्यादी पैकी कशाचाही भेद न करता सर्व प्रोढ नागरिकांना मतदानाचा सार्वत्रिक अधिकार आणि त्याचबरोबर इतर मूलभूत अधिकार देण्यात आले. लोकशाही व्यतिरिक्त इतर कोणत्याही राजकीय व्यवस्थेत म्हणजे व्यक्तिगत अथवा पक्षीय हुकूमशाहीत ही गोष्ट अशक्य होती. सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था यांना कोणतीही बाधा न आणता विशेषता राज्यकर्त्यांच्या भूमिकेविरुद्ध टीका अथवा असहमती व्यक्त करण्याचा अधिकार हे लोकशाहीधीष्टीत राष्ट्रवादामध्ये अभिप्रेत असल्याचा ठाम विश्वास डॉ.बाबासाहेबांना होता. तसेच लोकशाही निर्णय प्रक्रियेत बहुसंख्यांना राज्य करण्याचा अधिकार असला तरी अल्पसंख्यांकांची गळचेपी होणार नाही अशी व्यवस्था करणे त्यांना अभिप्रेत होते. त्याबरोबरच सरकारच्या धोरणावर टीका अथवा त्याला विरोध करणे हा प्रत्येकाचा लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार असून त्यामुळे लोकशाही सुदृढ होत असते त्यामुळे सरकारवरची टीका म्हणजे राष्ट्रद्रोह हा युक्तिवाद त्यांना हास्यास्पद वाटत होता आणि शेवटच म्हणजे डॉ.बाबासाहेबांना व्यक्तीपूजा अमान्य होती.

आधुनिक भारताची उभारणी करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी आयुष्यभर संघर्ष केला त्यांना विषमतेविरुद्ध प्रचंड चीड होती. त्यांनी म्हटले होते की लोकशाही यशस्वी व्हायची असेल म्हणजे राष्ट्रवाद अर्थपूर्ण व्हायचा असेल तर प्रथम समाजव्यवस्थेत विषमता असता कामा नये पीडित, दडपलेला वर्ग समाजात असता कामा नये सर्व हक्क व सत्तेचे केंद्रीकरण ज्यांच्याकडे केंद्रित झाले आहे असा वर्ग एका बाजूला व सर्व प्रकारचा भार, ओझे वाहणारा वर्ग दुसऱ्या बाजूला अशी विभागणी असता कामा नये. अशी विषमता आणि अन्यायकारक विभागणीवर आधारलेल्या समाज व्यवस्थेमध्ये हिंसात्मक क्रांतीची बीजे असतात मग त्याचे परिमार्जन करणे लोकशाहीला अशक्य होते. डॉ. बाबासाहेबांनी भारतीय राष्ट्रवादावर एक अत्यंत मार्मिक भाष्य केले होते ते म्हणाले होते हे भारतातील अल्पसंख्यांकांच्या दुर्दैवाने भारतीय राष्ट्रवादाने एक नवीन प्रथा रूढ केली आहे स्वतःच्या मर्जीनुसार अल्पसंख्यांकांवर राज्य करण्याचा बहुसंख्यांकाचा दैवी अधिकार म्हणजे राष्ट्रवाद समजला जातो आणि अल्पसंख्याकांनी सत्तेमध्ये थोडासाही वाटा मागणे म्हणजे जातीयवाद मानला जातो देशावर राज्य करण्याचा बहुसंख्यांकाचा धार्मिक तथाकथित दैवी अधिकार डॉ. बाबासाहेबांना पूर्णपणे अमान्य होता.

**सारांश :**

आज देशात राज्यकर्त्यानी भारतीय राष्ट्रवादाऐवजी हिंदू राष्ट्रवाद स्थापन करण्याचा मुद्दा संपूर्ण समाज जीवनाच्या केंद्रस्थानी आणला आहे. असे हिंदू राष्ट्र डॉ. बाबासाहेबांच्याएकूणच विचारप्रणालीच्या विरुद्ध आहे. धर्म, भाषा, प्रदेश, इत्यादी मधील भारताचे वैभव असलेल्या विविधतेतून निर्माण झालेल्या सर्वसमावेशक संस्कृतीवर आधारलेल्या भारतीय राष्ट्रवादाचे खंडन करून एक धर्म, एक संस्कृती, एक पक्ष, एक नेता या तत्वावर आधारलेल्या हिंदू राष्ट्रवादामध्ये प्रामुख्याने धार्मिक अल्पसंख्यांकांची आणि त्यातही मुस्लिम समाजाची कशी स्थिती झालेलीआहे हे आपण पाहतोच आहोत परंतु हे दुष्टचक्र फक्त धार्मिक अल्पसंख्याक व विशेषतः मुस्लिम समाजापर्यंत थांबत नसून शूद्र समजल्या गेलेल्या आणि तरीही हिंदूंच्या आहारी गेलेल्या ओबीसी समाजाची तसेच दलित, आदिवासी समाजाची गत फारशी वेगळी असणार नाही आरक्षणाच्या धोरणाचा वेगाने संकोच होत आहे.

तर ओबीसी, दलित, आदिवासी त्यांच्या माथी अकार्यक्षम असा ठसा पूर्वीच मारण्यात आला आहे. सनातनी रूढी परंपरेचे समर्थन करून स्त्रियांचे अधिकार संकुचित करण्यात येत आहे कल्याणकारी राज्य व्यवस्था कोसळल्यामुळे सर्व जाती धर्मातील गरीब भरडले जात आहे अशा रीतीने बहुसंख्य समाजाला परिघाबाहेर ठेवणारे हिंदुराष्ट्र नेमके कुणासाठी असा प्रश्न पडतो. तेव्हा अशावेळी भारतीय राष्ट्रवादाच्या बाजुने राहणे हेच भारतीय लोकांचे आज कर्तव्य आहे.

**संदर्भ सूची :**

1. डॉ. कसबे रावसाहेब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे, २००७
2. मेश्राम केशव, डॉ. आंबेडकर चिंतन, लोकवाङ्मय गृह,२००९
3. पानतावणे गंगाधर, (संपा), डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन, पुणे,१९९८
4. लोकसत्ता (वृत्तपत्र)
5. महाराष्ट्र टाईम्स(वृत्तपत्र)